# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

माहितीचा अधिकार

---

**जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./१५९/2018** **दि. ४/७ /2018**

प्रति,

श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडीस,
504, प्रथमेश ऑर्चिड, टेंबा रोड,
भाईंदर (प.) 401 101.

विषय :- <u>केंद्रशासन माहितीचा अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत दि. 03/03/2018 रोजी केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत...</u>

संदर्भ :- 1) आपलेकडील दि. 17/04/2018 रोजीचा अर्ज.
2) इकडील पत्र क्र.मनपा/आस्था/मा.अ./159/2018, दि. 08/05/2018.
3) जा.क्र.मनपा/मा.अधि/अपील/79/2018, दि. 30/06/2018 रोजीचा प्रथम अपील निर्णय. (प्राप्त दि. 02/07/2018.)

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविणेत येते की, केंद्रशासन माहितीचा अधिकार अधिनियम-2005 अंतर्गत आपण दि. 03/03/2018 रोजी केलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मुद्देनिहाय माहिती अपेक्षीलेली होती. त्यानुसार संदर्भ क्र. 02 अन्वये अर्जदारांना माहिती देण्यात आली होती. सदर माहितीने अर्जदार यांचे समाधान न झाल्याने संदर्भ पत्र क्र. 03 अन्वये प्रथम अपील सादर केले असून, प्रथम अपीलीय निर्णयानुसार अर्जदारांना मुद्देनिहाय सुधारित माहिती देण्यात यावी, असे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार मुद्देनिहाय सुधारीत माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

मुद्दा क्र. 01 :- श्री. क्लासो जॉर्ज फर्नांडीस, यांनी दि. 03/03/2018 रोजी मा. आयुक्त यांना दिलेल्या अर्जाच्या छायांकित प्रती सोबत पृष्ठ क्र. 01 व 03 अन्वये संदर्भ पत्र क्र. 02 अन्वये जोडून देण्यात आलेल्या आहेत.

मुद्दा क्र. 02 :- दि. 03/03/2018 रोजीच्या तस. उप-आयुक्त (मुख्यालय) यांना दिलेल्या अर्जावर मा. उप-आयुक्त (मुख्यालय) यांनी मारलेल्या शेऱ्याबाबत अर्जावर करण्यात आलेली कारवाई सोबत पृष्ठ क्र. 01 ते 05 अन्वये जोडून देण्यात येत असून, सादर अहवालामधील पृष्ठ क्र. 02 मधील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-1095/प्र.क्र.33/95/बारा, दि. 01 नोव्हेंबर 1995 या शासन निर्णय याची प्रत पृष्ठ क्र. 06 अन्वये जोडून देण्यात येत आहे.

मुद्दा क्र. 03 व 04 :- मुद्दा क्र. 02 प्रमाणे

सदरची माहिती उपलब्ध अभिलेख्यानुसार देण्यात येत असून, सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास सदर जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. तदनंतरही समाधान न झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी, श्री. विजयकुमार म्हसाळ, मा. उप-आयुक्त (मुख्यालय), तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसांत अपील करता येईल.

04/7/18

(प्रकाश कुलकर्णी)
जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका